पोलीस निरीक्षक,
अमळनेर पोलीस स्टेशन, ढेकु-सिम रोड, अमळनेर, जि. जळगाव.
पिन नंबर - 425 401
दुरध्वनी क्रमांक. 02587-222233
Email ID - piamalnerps@gmail.com

दि.09/07/2025

जा.क्र. /पो.नि./अमळनेर पो.स्टे./2025

## -: प्रेस नोट :-
## -: Press Note :-

प्रस्तुत बातमीची हकिकत अशी की, दि.24/05/2025 रोजी रात्री 22.30 ते दि.25/05/2025 रोजीचे पहाटे 05.00 वाजेचे दरम्यान अमळनेर शहरातील प्लॉट नंबर 217/5 ओमसाई श्रध्दा नगर, अमळनेर येथील फिर्यादी नामे प्रविण हरिश्चंद्र ठाकुर, वय 44 वर्षे, धंदा - चालक, रा. प्लॉट नंबर 217/5 ओमसाई श्रध्दा नगर, अमळनेर यांच्या मालकीची रू. 1,50,000/- रू. कि. ची एक पर्पल पांढ-या रंगाची मारूती सुझूकी कंपनीची डिझायर NEW VDI मॉडेलची चारचाकी गाडी तिचा क्र.MH18 AJ3110 असा असुन तिचा इंजिन नंबर D13A5036282 व चेचिस क्र.MA3FJEB1S00496237 असा असलेली जु.वा.कि.अ. हे चारचाकी वाहन फिर्यादीचे घरासमोरून कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे समंतीवाचुन लबाडीच्या इरादयाने चोरून नेल्याने फिर्यादी यांनी अमळनेर पोलीस स्टेशन येथे समक्ष येवुन त्यांचे वर नमुद चारचाकी वाहन चोरी झाल्याने अमळनेर पोलीस स्टेशन **गु.नो.क्र.0217/2025**, भा. न्या. संहिता कलम 303(2) प्रमाणे दि. 25/05/2025 रोजी दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्हयातील चोरीस गेलेले वर नमुद चारचाकी वाहनाचे तांत्रिक विश्लेषण तसेच गोपनिय माहितीच्या आधारावर सदर गुन्हयातील चोरीस गेलेल्या चारचाकी वाहनाची खात्रीलायक माहिती मिळाल्याने मा. डॉ. महेश्वर रेड्डी - पोलीस अधिक्षक, जळगाव व मा. सौ. कविता नेरकर - अपर पोलीस अधिक्षक, चाळीसगाव परिमंडळ, चाळीसगाव तसेच श्री. विनायक कोते - उपविभागीय पोलीस अधिकारी, अमळनेर भाग, अमळनेर यांचे सुचनांप्रमाणे सदर गुन्हयातील चोरीस गेलेल्या चारचाकी वाहनाच्या तपासकामी श्री. दत्तात्रय निकम, पोलीस निरीक्षक - अमळनेर पोलीस स्टेशन यांच्या मार्गदर्शनाखाली व श्री. शरद बागल - पो. उप नि., स्थानिक गुन्हे शाखा, जळगाव यांच्या गोपनिय माहितीच्या आधारावर अमळनेर पोलीस स्टेशन मधील गुन्हे अन्वेषण पथकाचे पो.उप.नि./नामदेव आनंदा बोरकर, पो.शि.2826/विनोद किरण संदानशिव व पो.शि.1311/निलेश सुभाष मोरे व पो.शि.2026/प्रशांत विजय पाटील तसेच पो.शि.1541/उज्वलकुमार बुधा म्हस्के दि.06/07/2025 रोजी अशांना मध्य प्रदेशात रवाना केले. त्यानुसार सदर पथकास दि.07/07/2025 रोजी मध्य प्रदेशातील मंदसोर जिल्हयातील सितामउ तालुक्यातील रावटी गावात सदर गुन्हयातील संशंयित इसम नामे राहुल पाटीदार (पुर्ण नाव माहित नाही) याने त्याच्या घराच्या मागील बाजुस असलेल्या गोडाउन मध्ये सदर गुन्हयातील चोरीस गेलेले वाहन लपवुन ठेवले असल्याने सीतामउ पोलीस स्टेशन कडील पोलीस मदत घेवुन नमुद संशयित इसमाच्या घराची व गोडाउनची झडती घेतली असता त्या ठिकाणी इतर ठिकाणावरून चोरी केलेले खालीलप्रमाणे नमुद चारचाकी वाहने मिळुन आली आहेत.

**01)** 35,00,000/- रू.कि.चे एक टोयोटा कंपनीची पांढ-या रंगाची फॉरच्युनर वाहन क्र.CG10 BL6776 असा असलेला तिचा चेचिस नंबर नष्ट केलेला असुन इंजिन नंबर 1GDA681552 असा असलेला जु.वा.कि.अ.

**02)** 12,00,000/- रू.कि.चे एक हुंडाई कंपनीची पांढ-या रंगाची क्रेटा कार क्र.MP04 ZL2963 असा असलेला तिचा चेचिस व इंजिन नंबर नष्ट केलेला जु.वा.कि.अ.

सदर गुन्हयात वर नमुद केल्याप्रमाणे चारचाकी वाहने जप्त करून नमुद वाहनांना अमळनेर पोलीस स्टेशन येथे आणुन त्याच्या तपासात वर नमुद चारचाकी वाहन क्र.**01)** हे CR NO.0362/2025, भा.न्या.संहिता कलम 303(2) प्रमाणे दि.03/07/2025 रोजी राणाप्रताप नगर पोलीस स्टेशन, नागपुर (शहर) येथील दाखल गुन्हयातील आहे तसेच वर नमुद चारचाकी वाहन क्र.**02)** हे CR NO.0101/2025, भा.न्या.संहिता कलम 303(2) प्रमाणे दि.08/04/2025 रोजी जळगाव (तालुका) पोलीस स्टेशन येथील दाखल गुन्हयातील असल्याचे निष्पन्न झालेले आहे.

सदर कारवाई मा. डॉ. महेश्वर रेड्डी - पोलीस अधिक्षक, जळगाव व मा. सौ. कविता नेरकर - अपर पोलीस अधिक्षक, चाळीसगाव परिमंडळ, चाळीसगाव तसेच श्री. विनायक कोते - उपविभागीय पोलीस अधिकारी, अमळनेर भाग, अमळनेर यांचे सुचना व मार्गदर्शनाखाली अमळनेर पोलीस स्टेशन कडील गुन्हे शोध पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी केलेली आहे.

(दत्तात्रय निकम)
**पोलीस निरीक्षक**
**अमळनेर पोलीस स्टेशन**